# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
# पोलीस शिपाई चालक भरती – २०२२-२०२३

## उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे आस्थापनेवरील चालक पोलीस शिपाई पदाच्या २०२ रिक्त जागा भरण्याकरीता पोलीस भरती -२०२२-२०२३ घेण्यात येत आहे. भरती प्रक्रियेतील उमेदवारांची मैदानी चाचणी पुर्ण झाली असुन मैदानी चाचणीमध्ये ५० टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची १:१५ या प्रमाणात कौशल्य चाचणीकरीता निवड करुन दि.१३/०८/२०२४ ते २९/०८/२०२४ या कालावधीत कौशल्य चाचणी घेण्यात येत आहे.

**कौशल्य चाचणीमध्ये ४० टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची १:१० या प्रमाणात लेखी परीक्षा दि.०४/०९/२०२४ रोजी दुपारी मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स एंड कॉमर्स, शिवाजीनगर, पुणे-०५ येथील परिसरातील ईमारतीमध्ये आयोजीत करण्यात येणार आहे. लेखी परीक्षेच्या अनुषंगाने लेखी परीक्षेकरीता पात्र ठरणा-या उमेदवारांना खालीलप्रमाणे महत्वाच्या सुचना देण्यात येत आहे.**

१. मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवाराकडे असतील तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. तसेच, स्वतःचे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेले फोटोच्या दोन प्रती सोबत आणाव्यात.

२. लेखी परीक्षा ९० मिनिटाची व १०० गुणासाठी आहे. लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाची आहे.

**३. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर दि.०४/०९/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता पोहोचणे अनिवार्य आहे.**

४. उत्तरपत्रिका कार्बनलेस ओ.एम.आर. प्रकारची दोन प्रतीत असेल व दुय्यम प्रत उमेदवारास त्याच्यासोबत घेवुन जाण्यास परवानगी देण्यात आली आहे.

५. OMR Sheet वरील सुचनांची काटेकोरपणे पालन करावे. तसेच काळया शाईचे बॉल पॉईंट पेन उमेदवारांना परीक्षा केंद्रावर पुरविण्यात येतील.

६. OMR Sheet वर स्वतःची ओळख उघड होईल असे कोणतेही चिन्ह नमुद करु नये/नाव लिहू नये खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये. असे आढळुन आल्यास त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल.

७. उमेदवार कॉपी करतांना आढळुन आल्यास त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरवुन त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

८. परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यन्त बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

९. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन/ डिजीटल डायरी/ मायक्रोफोन/ कॅलक्युलेटर/ नोटपॅड/ नोटस् पुस्तके/ इयरफोन/ hearing aide device इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होवू शकतो. असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळुन आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवुन त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच कसुरदाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०. अंतिम निकाल लागल्यानंतर उमेदवारांना लेखी परीक्षेस प्राप्त गुणासंदर्भात काही शंका/ तक्रार असल्यास त्या संदर्भात निकालानंतर २४ तासाच्या आत उमेदवारांनी घटक प्रमुख (भरती अध्यक्ष) यांच्या नांवाने रु.२००/- शुल्कासह हजर राहून लेखी निवेदन सादर करावे. २४ तासानंतर येणा-या उमेदवारांच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

( अरविंद चावरिया )
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन
तथा अध्यक्ष, भरती निवड मंडळ, पुणे शहर

Scanned with OKEN Scanner